**नियमित दिवाणी दावा क्र.५१/२००८**
**विक्रम वि. गोविंद**

-:: **नि.क्र.१ लगत आदेश** ::-

मी प्रकरणाचे काळजीपूर्वक अवलोकन केले. प्रतिवादीतर्फे दि.१३/०३/२०१३ रोजी ग्रामपंचायत टाकळी येथील ग्रामसेवक श्रीकांत धोंडीराम पताळे यांचा प्रतिवादी साक्षीदार क्र.४ म्हणून पुरावा झालेला आहे. त्यानंतर प्रतिवादींनी सदर बाब लपवून ठेवली आणि अर्ज नि.१९५ प्रमाणे पुन्हा ग्रामसेवक ग्रामपंचायत टाकळी यांना साक्षीसमन्स काढण्यासाठी अर्ज दिला. परंतु त्यास अर्जामध्ये सदर साक्षीदाराचा फेरतपास घ्यायचा आहे किंवा त्यास पुन्हा का तपासायचे याबाबत कारण दिलेले नव्हते. दाव्याचा अभिलेख मोठा असल्याने अर्ज नि.१९५च्या आदेशाच्या वेळी प्रतिवादी क्र.४ ची साक्ष दिसून आली नव्हती किंवा वादीच्या वतीने त्याबाबत युक्तिवाद केला नव्हता. यथास्थितीत प्रतिवादींनी सदरची स्थिती लपवून ठेवून आदेश प्राप्त केलेला आहे. त्यामुळे प्रतिवादींचा प्रामाणिकपणा स्थापित झाला नाही. त्याचप्रमाणे आजरोजी सदर साक्षीदार म्हणजेच श्रीकांत धोंडीराम पताळे हजर आहेत. त्यामुळे मी प्रतिवादीचे अधिवक्ता श्री. बी.व्ही. पाटील यांना सदर साक्षीदाराला नव्याने का तपासायचे आणि नव्याने तपासता येईल काय ? किंवा त्याचा पुन्हा सरतपास घेता येईल काय ? याबाबत विचारणा केली. परंतु त्यांनी त्या अनुषंगाने युक्तिवाद केला नाही आणि साक्षीदाराची साक्ष घेतली नाही. त्यानंतर साक्षीदाराचा वारंवार पुकारा केला असता तो गैरहजर आहे. सबब साक्षीदार आणि प्रतिवादींनी कसूर केल्यामुळे साक्षीदाराला मुक्त करण्यात येते

<u>नियमित दिवाणी दावा क्र.५१/२००८</u>
<u>विक्रम वि. गोविंद</u>

आणि प्रतिवादींनी पुरावा देण्यास कसूर केल्याने प्रकरण साक्ष बंद करण्याच्या आदेशासाठी पुढील तारखेला नेमण्यात येते.

०२. आदेश संगणकावर टंकलिखित केला आणि खुल्या न्यायालयात घोषित केला.

Digitally signed by SHARAD AWADHUTRAO SURJUSE
Date: 2026.02.26 17:14:00 +0530

**ठिकाण – देवणी** **( श.अ. सुरजुसे )**
**दिनांक – २६–०२–२०२६** **दिवाणी न्यायाधीश क. स्तर,**
**देवणी.**